RNI New Delhi-MAHMAR/2011/41080

साप्ताहिक भारतभर वितरीत होणारे

लेवा जगत

संपादक : शाम वसंत पाटील

Book - Post

Parvana(Subs.5000)/L-218/RNP-BH-91/2023-2025

To,

वितरीत न झाल्यास परत पाठवण्याचा पत्ता :-
साप्ताहिक लेवा जगत
वंजारवाडी मु. पो. सावदा ता. रावेर, जि. जळगांव (महा.) ४२५ ५०२

पान-१ ■ वर्ष : १९ ■ अंक : ४७ ■ रविवार , ३१ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२६ ■ पाने : ४ ■ किंमत-१०/-रु.

'अंतर्नाद' ची 'एक दुर्वा समर्पणाची' दशकभराची वाटचाल

प्रतिनिधी भुसावळ

गणेशोत्सव म्हटला की सजावट, रोषणाई आणि विविध कार्यक्रमांवर होणारा मोठा खर्च डोळ्यासमोर येतो. मात्र, याच उत्सवातील अनावश्यक खर्चाला फाटा देत गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावण्याचा अनोखा सामाजिक संदेश देणारा 'एक दुर्वा समर्पणाची' उपक्रम भुसावळ येथील 'अंतर्नाद प्रतिष्ठान'तर्फे यंदाही राबविण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या उपक्रमाचे यंदा दहावे वर्ष असून, गेल्या नऊ वर्षांत हजारो विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला या उपक्रमातून आधार मिळाला आहे.गणरायाला अर्पण करण्यात येणाऱ्या दुर्वेप्रमाणेच शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून ज्ञानाची दुर्वा समर्पित करण्याची संकल्पना अंतर्नाद प्रतिष्ठानने गेल्या दशकभरापासून जपली आहे.

रावेर लोकसभा मतदारसंघात ७१.१९ कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन

रावेर, यावल, फैजपूर-सावदा शहरांतर्गत महामार्गाला समांतर मार्गांचा विकास; फैजपूर येथे ६.५१ कोटींच्या नवीन उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे बांधकाम

रावेर : रावेर लोकसभा मतदारसंघातील पायाभूत सुविधांच्या विकासाला आणखी गती देण्यासाठी रावेर, यावल आणि फैजपूर-सावदा शहरांतर्गत महामागार्ला समांतर मार्गांच्या विकासकामांसह फैजपूर (यावल) येथील नवीन उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले. केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती रक्षाताई खडसे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या विकासकामांना मंजुरी मिळाली आहे.

बुऱ्हाणपूर-अंकलेश्वर चारपदरी राष्ट्रीय महामागार्मुळे रावेर, यावल, फैजपूर आणि सावदा शहरांना बायपास मार्ग उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे शहरांतर्गत वाहतूक, नागरिकांचे दैनंदिन व्यवहार तसेच व्यापारी वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी महामागार्ला समांतर शहरांतर्गत मार्ग विकसित करण्यात येत आहेत.

या अंतर्गत यावल शहरातील ६.५ कि.मी. समांतर मागार्सांठी १४.५९ कोटी रुपये, फैजपूर-सावदा शहरातील १४.२३० कि.मी. मागार्सांठी २७.९९ कोटी रुपये, तर रावेर शहर ते महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेदरम्यानच्या ११.१०० कि.मी. समांतर मागार्सांठी २२.१० कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. या तीनही कामांसाठी एकूण ६४.६८ कोटी रुपये खर्च होणार आहे.

याशिवाय फैजपूर (यावल) येथे सुरू असलेल्या बुऱ्हाणपूर-अंकलेश्वर

उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी ६.५१ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. नवीन इमारतीमुळे नागरिकांना अधिक सुसज्ज प्रशासकीय सुविधा मिळणार असून शासकीय कामकाज अधिक प्रभावी व सुलभ होण्यास मदत होणार आहे.

अशाप्रकारे आज भूमिपूजन झालेल्या चारही विकासकामांसाठी एकूण ७१.१९ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांसोबतच हे समांतर मार्ग शहरांतर्गत वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. या कामांमुळे वाहतूक अधिक सुरक्षित व सुरळीत होण्यासोबतच स्थानिक व्यापार, दळणवळण आणि परिसराच्या आर्थिक विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

यावेळी विधानपरिषद सदस्य नंदकिशोर महाजन यांच्यासह रावेर, यावल, फैजपूर व सावदा येथील भाजपा पदाधिकारी, नगराध्यक्ष, नगरसेवक आणि भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

युजीसी-नेट परीक्षेसाठी परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

जळगाव, दि. ६ (जिमाका) : युजीसी-नेट (UGC-NET) परीक्षा दि. ९ व १० सप्टेंबर २०२६ रोजी जळगावातील आर्यॉन डिजिटल आयडीझेड, देवकर महाविद्यालय परिसर, श्री गुलाबराव देवकर महाविद्यालय, शिरसोली रोड येथे दोन सत्रांत घेण्यात येणार आहे. परीक्षा सुरळीत व शांततेत पार पडावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी वेशाली चव्हाण यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

या आदेशानुसार, दि. ९ व १० सप्टेंबर रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत परीक्षा केंद्राच्या २०० मीटर परिसरात अनधिकृत प्रवेश तसेच जमाव करण्यास बंदी राहणार आहे. या परिसरातील झेरॉक्स दुकाने, एसटीडी/पीसीओ, सायबर कॅफे आणि इंटरनेट सेंटरही बंद ठेवण्यात येणार आहेत. तसेच ध्वनिक्षेपकाचा वापर आणि घोषणाबाजी करण्यास मनाई करण्यात आली आहे.

परीक्षेच्या दिवशी परीक्षा केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावर उमेदवारांची आवश्यक ती कडक तपासणी करण्यात येणार आहे. उमेदवारांना मोबाईल फोन, कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण, मिनी स्पाय कॅमेरा, स्मार्ट वॉच, ब्लूटूथ ईअरपीस, डिजिटल गॅझेट्स, कागदाच्या चिठ्ठ्या किंवा इतर प्रतिबंधित वस्तू परीक्षा केंद्रात घेऊन जाण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

परीक्षा केंद्र परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि परीक्षा प्रक्रिया कोणत्याही अडथळ्याविना पार पडावी, यासाठी प्रशासनाने हे प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

भुसावळ आरटीओ कार्यालयात फिटनेस मूल्यांकन शिबिर

डॉ.उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी सप्ताह निमीत्त उपक्रम

भुसावळ : डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या वतीने फिजिओथेरेपी सप्ताहअंतर्गत भुसावळ येथील आरटीओ कार्यालयात फिटनेस मूल्यांकन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

कर्डिओ- रेस्पिरेटरी फिजिओथेरपी विभागातर्फे या शिबिराचे आयोजन करण्यात आले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयवंत नागुलकर,राहुल गिरी (प्रशासकीय अधिकारी) यांच्या मार्गदर्शनानुसार डॉ. अमित जैस्वाल (विभागप्रमुख — हृदय व श्वसन फिजिओथेरपी), डॉ. प्रियांका घुमनानी (सहाय्यक प्राध्यापक), डॉ. सुदेश वायदंडे (निवासी डॉक्टर), डॉ. पूजा गुरुदासानी (निवासी डॉक्टर) आणि त्यांच्या टीमच्या सहकायार्ने हे शिबिर पार पडले. फिटनेस मूल्यांकन शिबिराचे व्यवस्थापन महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेने केले. शिबिरामध्ये एकूण ३० पोलीस अधिकाऱ्यांची तपासणी करण्यात आली व त्यांच्या हृदय व श्वसनविषयक तंदुरुस्तीचे मूल्यांकन करण्यात आले. या मूल्यांकनासाठी वायएमसीए ३ मिनिट स्टेप टेस्ट घेण्यात आला.पोलीस अधिकाऱ्यांच्या हृदय व श्वसनविषयक तंदुरुस्तीचे मूल्यांकन करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा—यांनी परिश्रम घेतले.

प्री-प्रायमरीच्या चिमुकल्यांमध्ये गो गो गोविंदाचा गजर

गोदावरी इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूल उत्साहात साजरी केली दहीहंडी

जळगाव : गोदावरी इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त प्री-प्रायमरीच्या चिमुकल्या

विद्यार्थ्यांसाठी दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी चिमुकल्यांनी गो गो गोविंदाचा गेर केला.

पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या चिमुकल्यांनी उत्साह, आनंद आणि जल्लोषात दहीहंडी साजरी केली गेली यावेळी शाळेच्या प्रिन्सीपल निलीमा चौधरी यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण व राधेच्या वेशभूषेत उपस्थित राहून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी 'गोविंदा आला रे आला' गो गो गोविंदा या गाण्याच्या तालावर नृत्य सादर केले. चिमुकल्यांनी मानवी मनोरा रचून दहीहंडी फोडण्याचा आनंद लुटला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि सणांचे महत्त्व समजावे, तसेच त्यांच्यामध्ये एकोपा, सहकार्य आणि संघभावना निर्माण व्हावी, हा उद्देश होता. कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या प्राचार्या सौ. नीलिमा चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

गोदावरीच्या विविध संस्थामध्ये शिक्षक दिन उत्साहात

डॉ. वर्षा पाटील कॉम्प्युटर ॲप्लिकेशन कॉलेज मध्ये शिक्षक दिन उत्साहात

जळगाव:गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ. वर्षा पाटील कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशनमध्ये शिक्षक दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस माल्यार्पण व पूजन करून करण्यात आली.याप्रसंगी बोलताना प्रा. लीना पाटील यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांच्या

जडणघडणीतील शिक्षकांचे स्थान व नैतिक मूल्यांचे महत्त्व विशद केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. नीलिमा वारके यांनी संबोधित करताना सांगितले की, शिक्षक हे जीवनातील ज्ञानाचे दीपस्तंभ असतात. आई-वडिलांनंतर योग्य मार्ग दाखवणारे, गुणांना वाव देणारे आणि विचारांना योग्य दिशा देऊन भविष्य घडवणारे कार्य शिक्षकच करतात. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन प्रा. शिवानी महाजन यांनी केले. गोदावरी आयएमआरजळगाव:स्थानिक गोदावरी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च (आयएमआर) मध्ये शिक्षक दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पाच थरांचा मानवी मनोरा रचत गोदावरी नर्सिंगच्या विद्यार्थिनींनी फोडली दहीहंडी !

चार प्रयत्नांनंतर यश; 'गोविंदा रे गोपाळा'च्या जयघोषात विद्यार्थिनींचा जल्लोष

जळगाव, दि. ४ सप्टेंबर : श्रीकृष्ण जन्माष्टमीचे औचित्य साधून गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा

करण्यात आला. विद्यार्थिनींची उत्स्फूर्त सहभाग नोंदवत तब्बल पाच थरांचा मानवी मनोरा रचून दहीहंडी फोडली. हंडी फोडण्यासाठी चार वेळा प्रयत्न करण्यात आले. अखेर पाचव्या थरावर यशस्वी चढाई करत विद्यार्थिनींनी दहीहंडी फोडताच परिसरात जल्लोष झाला.

कार्यक्रमाला गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. उल्हास पाटील,डी एम कॉर्डीओलॉजीस्ट तु सदस्य गोदावरी फॉउंडेशन डॉ. वैभव पाटील, गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगच्या प्राचार्या विशाखा गणविर,उपप्राचार्य जेसिंथ ढाया,डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत सोलंके, डॉ. केतकी पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगचे प्राचार्य शिवानंद बिरादार, वैद्यकिय अधिक्षक डॉ प्रेमचंद पंडीत, कार्यकारी अधिकारी डॉ. विजय बाविस्कर, परिचारीका अधिक्षक संकेत पाटील यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक विशाखा वाघ यांनी केले. दहीहंडीच्या उत्सवात विद्यार्थिनींनी पारंपरिक वेशभूषेत उत्साहाने सहभाग घेतला.गणेश वंदनाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व भगवान गोपाळ कृष्णाचे पूजन व झूला करण्यात आला. 'गोविंदा रे गोपाळा'च्या जयघोषात विद्यार्थिनींच्या पथकांनी मानवी मनोरा रचण्यास सुरुवात केली. पहिल्या काही प्रयत्नांत हंडी फोडण्यात यश आले नाही. मात्र, विद्यार्थिनींनी हार न मानता पुन्हा जोमाने प्रयत्न केले. चार प्रयत्नांनंतर पाच थरांचा मजबूत मानवी मनोरा उभारण्यात आला आणि अखेर दहीहंडी फोडण्यात विद्यार्थिनींना यश आले.हंडी फुटताच विद्यार्थिनींनी जल्लोष करत आनंद साजरा केला. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या अधिरम बंचने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार यांनी मानले यशस्वीतेसाठी गोदावरी व डॉ. केतकी पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा—यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमातून विद्यार्थिनींमध्ये एकजूट, संघभावना, आत्मविश्वास, शिस्त आणि परस्पर सहकार्याची भावना दृढ झाली.यावेळी मान्यवरांनी विद्यार्थिनींच्या उत्साहाचे कोतुक केले. पारंपरिक सण-उत्सवांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीची ओळख होण्यासोबतच संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत होते, असे उपस्थितांनी नमूद केले. उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात पार पडलेल्या या दहीहंडी सोहळ्यामुळे गोदावरी व डॉ. केतकी पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगचा परिसर कृष्णमय झाला होता.मान्यवरांच्या हस्ते पारितोषीक वितरण करण्यात आले.

सावदा शहरातील विविध मंदिरांत श्रीकृष्ण जन्मोत्सवाचा भक्तिमय जल्लोष

भजन, आरती, पाळणा व फटाक्यांच्या आतषबाजीने शहर झाले कृष्णमय; भाविकांची मोठी उपस्थिती

लेवाजगत न्यूज सावदा : श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त सावदा शहरातील विविध मंदिरांमध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सव

मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला. गांधी चौकातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, श्री स्वामीनारायण मंदिर, छत्रपती शिवाजी चौक परिसरातील वंजारवाडी येथील श्री मुरलीधर मंदिर तसेच महानुभाव मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्वच मंदिरांमध्ये भाविक व सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गांधी चौकातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात भक्तिमय वातावरण : गांधी चौकातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात श्रीकृष्ण जन्मोत्सव भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. जन्मोत्सवानिमित्त महिलांनी रात्री १० ते १२ वाजेपर्यंत भजन सादर केले. विविध भक्तिगीतांनी मंदिर परिसर दुमदुमून गेला. रात्री बारा वाजता श्रीकृष्ण जन्माचा मुख्य सोहळा पार पडला. जन्माचा क्षण होताच फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. श्रीकृष्णाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. भाविकांनी श्रीकृष्णाचे दर्शन घेत जन्मोत्सवाचा आनंद लुटला.

स्वामीनारायण मंदिरात भजन संध्या व पाळणा सोहळा : श्री स्वामीनारायण मंदिरात रात्री ९ ते १२ वाजेपर्यंत भजन संध्याचे आयोजन करण्यात आले होते. हरिभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भजनांचा आनंद घेतला. रात्री बारा वाजता आरती करण्यात आली. मंदिराची रंगीबेरंगी फुग्यांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. चांदीच्या पाळण्यात श्रीकृष्णाची मूर्ती ठेवून पाळणा झुलविण्यात आला.

यावेळी मंदिराचे कोठारी स्वामी स्वयंप्रकाशदासजी, पुजारी सत्यप्रकाशदासजी, स्वामीनारायण गुरुकुलचे उपाध्यक्ष कोशिंद्रा, गुजरात येथील स्वामी स्वरूपदासजी, सावदा गुरुकुलचे उपाध्यक्ष अनंतप्रकाशदासजी तसेच भक्तिप्रिय स्वामी, धर्मप्रिय स्वामी आणि विश्वप्रकाशदासजी यांची उपस्थिती होती. जन्मोत्सवानंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

वंजारवाडीतील श्री मुरलीधर मंदिरात उत्साह : छत्रपती शिवाजी चौक परिसरातील वंजारवाडी येथील श्री मुरलीधर मंदिरातही श्रीकृष्ण जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. परिसरातील भक्त-भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जन्मोत्सवाचा आनंद घेतला. श्रीकृष्ण जन्माच्या वेळी मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

महानुभाव मंदिरात सेवेकऱ्यांची उपस्थिती : शहरातील महानुभाव मंदिरातही श्रीकृष्ण जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने सेवेकरी उपस्थित होते. मानेकर बाबा शास्त्री यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश फड यांनी उपस्थित राहून श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळ्यात सहभाग घेतला.जयघोषाने सावदा शहर दुमदुमले : सावदा शहरातील विविध मंदिरांमध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमांना भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

संगीतकलेला मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे..

ज्येष्ठ समाजसेवक प्रवचनकार डॉ.रवींद्र भोळे

उरुळी कांचन तुपे वस्ती: संगीत कलेला अति प्राचीन

असा इतिहास आहे. सत्ययुग, द्वापार युग, त्रेता युग पासून तर कलियुगापर्यंत तत्ववेत्त्यांनी संगीताचे महत्त्व सागितले आहे. सामवेदामध्ये संगीताचा खूप अभ्यास सामावलेला आहे.संगीतामुळे ताण तणाव कमी होतो, स्मरणशक्ती व सकारात्मक प्रवृत्ती वाढीस लागते. गायनामुळे श्वासो श्वास सुरळीत होऊन मानसिक व शारीरिक व्याधी दूर होऊ शकतात. मानसिक व सार्वजनिक संबंध टिकवून ठेवण्यासाठी संगीत अत्यंत महत्त्वाचे माध्यम आहे. संगीत कलेला जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे मत ज्येष्ठ समाजसेवक प्रवचनकार डॉ रवींद्र भोळे यांनी येथे व्यक्त केले. सम्राट बहुउद्देशीय जनजागृती सेवाभावी संस्था संचालित श्री साने संगीत विद्यालय सो रेखा शिवराज साने, शिवराज ज्ञानोबा साने गायक यांचे वतीने गुणगौरव पारितोषिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रवींद्र भोळे यांनी वरील मत व्यक्त केले. आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले की अन्न ,अक्षर, आरोग्य आणि आचरण मानवी जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाचे असताना संगीत सुद्धा एक महत्त्वाची भूक असते. अशा प्रकारची संगीताची भूक भागवण्यासाठी साने सरांनी केलेला प्रयत्न कोतुकास्पद आहे. या कार्यक्रमाला व्यासपीठावर विनोद मारुती अष्टूळ जेष्ठ कवी लेखक व साहित्यिक, सागर बाळासाहेब कांचन सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ समाजसेवक प्रवचनकार डॉ रवींद्र भोळे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर्स वेल्फेअर असोसिएशन उरुळी कांचन, महंत गोपाल व्यास कपाटे महानुभाव पंथ उरुळी कांचन, उरुळी कांचन येथील पत्रकार सो सुवणातंई कांचन, अमोल भोसले पत्रकार दैनिक केसरी बापूसाहेब चोधरी पत्रकार महाराष्ट्राची भूमी, सहदेव खंडागळे पत्रकार दैनिक लोकमत, प्रामुख्याने उपस्थित होते.